नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


# प्रेस नोट

दिनांक 21/06/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

## खून

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावर गंगापूर फाटा उमरेड येथे दिनांक 20/06/2021 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादीचा पती नामे– शुभम मोतीराम ठवकर(मृतक) वय 25 वर्ष रा. गांगापुर, उमरेड व आरोपी क्रं. 1) शोयब जानी शहिद शेख वय 21 वर्ष, रा. कावरापेठ उमरेड हे एकमेकांचे परिचीत असुन दोघेही घुग्गुस जि. चंद्रपुर येथे कोळसा खदानीत गाडीवर चालक म्हणुन कामावर होते. त्यादरम्यान दोघांमध्ये लायसन्सच्या कारणावरून झगडाभांडण होवुन मारामारी झाल्याने दिनांक 19/06/2021 रोजी जुन्या वादाचे कारणावरून आरोपी क्रं. 1) जानी शहिद शेख वय 21 वर्ष 2) विक्रांत विक्की महेन्द्रसिंग चंदेल, वय 22 वर्ष दोन्ही रा. कावरापेठ उमरेड हे वारंवार मृतकाचे घरी जावुन मृतक घरी हजर मिळुन न आल्याने मृतकाचे पत्नी समोर मृतकाला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. तसेच घटणा ता. वेळी आरोपी क्रं. 2 याने मृतकाला त्याचे घरून पत्नी समोर बोलावुन घेवुन जावुन गांगापूर फाटा, उमरेड येथे नेवनु संगणमत करून मृतकाचे डोक्यावर जड दगडाने व फर्शीने मारून गंभीर जखमी करून जिवानीशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ शितल शुभम ठवकर वय 22 वर्ष रा. गांगापूर उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 302, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. राजेश पाटील 9049989341 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– पोलिस स्टेशन कुही येथे दिनांक 20/06/2021 रोजी फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर मुखरूजी फुले वय 37 वर्ष, रा. राणी दुर्गावती चौक पंचशील नगर, नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक 17/06/2021 चे 10.30 वा. ते 20/06/2021 चे 14.00 वा. दरम्यान मौजा मांगली शिवारातील त्यांचे शेतातील घरात शेतगडी म्हणुन राहत असलेला नरेश दशरथ कुरूडकर (मृतक) वय 37 वर्ष रा. फेगड ता. कुही यास चोरी करण्याच्या उद्देशाने अज्ञात आरोपीने कोणत्यातरी हत्याराने जिवानीशी ठार मारून सदर शेतातील घरामध्ये टीनाच्या पेटीत शेती कामासाठी ठेवलेल नगदी 51,000/–रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलिस स्टेशन कुही येथे आरोपीविरूद्ध अप क्र. 229/2021 कलम 302, 397 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. चंद्रकात मदने पोस्टे कुही मो. क्र. 9922436195 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर